# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ०८/२००९/ दिनांक :

श्री. नामदेव धोंडीबा हाके , अर्जदार
मु.पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि., संवसु मंडळ कार्यालय,
विश्रामबाग , सांगली. विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता,
महावितरण, विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ,
जिल्हा सांगली.

३) सहाय्यक अभियंता,
महावितरण, उप विभाग, जत, जि. सांगली

**कोरम** :- १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : ०८.०६.२००९

प्रस्तुत अर्ज ता. १५.१.२००९ रोजी या कार्यालयास अनुसूची अ नमुन्यामध्ये प्राप्त झाला. अर्जदाराची तक्रार ही वि.प. यांनी त्यांच्या शेतीच्या वीज पंपाचा विद्युत पुरवठा ता. २०.७.२००८ रोजी कोणत्याही प्रकारची नोटीस न देता तोडला असल्याबद्दल नियमाप्रमाणे नुकसान भरपाई मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. अर्जदाराने सुरुवातीस दि. २८.८.२००८ रोजी क्ष नमुन्यामध्ये अर्ज अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सांगली यांचेकडे केला होता व दाद मागितली होती. अंतर्गत कक्षाने अर्जदाराची नुकसान भरपाईची मागणी अमान्य केली व म्हणून त्या विरुध्द प्रस्तुत अर्ज या मंचाकडे करण्यात आलेला आहे.

या प्रकरणामध्ये आवश्यक महत्वाच्या बाबी या खालील प्रमाणे होत.

अर्जदर हा ता. २०.५.१९९६ पासून वि.प.चा ग्राहक आहे. त्यांचे विहीरीवर ७.५ एचपी मोटर पंपासाठी वीज जोडणी अेजी २३६ (२७००८०३६०३६१) अशी क्रमांकाची आहे. सदरची वीज जोडणी ही मौंजे कोसारी येथील शेगाव तलावाजवळ गट क्र. २०६ या शेत जमिनीतील विहीरीवर आहे.

अर्जदाराचे म्हणणे की, त्यांच्याकडे कोणतेही वीज बील बाकी नसतांना तसेच विद्युत पुरवठा खंडीत करणेसाठी विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ५६ अन्वये कोणतीही नोटीस दिली नसतांना व पूर्व सूचना न देता अर्जदराच्या मोटारीचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आलेला आहे. अर्जदाराचे म्हणणे की, जत विद्युतधारक या वीज ग्राहकांचे संघटनाने या बाबत वितरण कंपनीकडे संपर्क साधला असता कोसारी येथे तलावाकाठचा सर्व मोटर पंपांचा विद्युत पुरवठा बंद करण्याचे शासनाचे आदेश आहेत जेणेकरुन दुष्काळासाठी पाणी नियोजन करण्याचे आहे असे सांगण्यात आले. शासनाच्या आदेशाप्रमाणे तळ्यावर असणाऱ्या वीज ग्राहकांचा विद्युत पुरवठा बंद करण्याचे आदेश जरी देण्यात आले असले तरी तळ्या व्यतिरिक्त संबंधित रोहित्रावरुन विहीरीवरील मोटर पंपांसाठीचा विद्युत पुरवठा बंद करण्याचा कोणताही आदेश नव्हता व तशी आवश्यकता नव्हती. परंतु वितरण कंपनीने त्यांच्या सोयीसाठी संपूर्ण रोहित्रावरील मोटरपंपांचा विद्युत पुरवठा बंद केल्याने तळ्यावरील व विहीरीवरील सर्व मोटर पंपांचा विद्युत पुरवठा बंद झाला. त्यामध्ये अर्जदार श्री. नामदेव धोंडीबा हाके यांच्या विहीरीवरील मोटर पंपाचा विद्युत पुरवठा आपोआपच बंद झाला. श्री. हाके यांच्यासह इतरही कांही ग्राहकांचा विद्युत पुरवठा बंद झालेला आहे, मात्र पुढे दि. २८.७.२००८ रोजी विद्युत पुरवठा सुरु करण्यात आला. असे हे वि.प.चे कृत्य नियमबाह्य व कायदाबाह्य असलेने सांगली कक्षाकडे दाद मागण्यात आली व कृती मानकेनुसार नुकसान भरपाईची मागणी केली. पीक नुकसानपोटी रु. ५०००/– ची मागणी करण्यात आली. तसेच अनाधिकाराने विद्युत पुरवठा बंद केल्यामुळे कृती मानके प्रमाणे दि. २७.७.२००८ ते २८.७.२००८ या कालावधीसाठी प्रति तास रु. ५०/– नुकसानीपोटी मागितले होते व आहे..

तसेच अर्जदाराचे असेही म्हणणे आहे की, अंतर्गत कक्षाने अर्ज केल्यापासून २ महिन्याच्या मुदतीमध्ये अर्जाचा निर्णय दिला नाही.

या प्रकरणामध्ये वि.प.कडे नोटीस पाठवून त्यांचे म्हणणे मागविण्यात आले. त्याप्रमाणे १२.२.२००९ रोजी वि.प.तर्फे म्हणणे देण्यात आलेले आहे. तसेच त्या सोबत कांही कागदपत्रे दाखल करण्यात आलेली आहेत. तदनंतर सदरचे प्रकरण सुनावणीसाठी सांगली येथे ता. २४.३.२००९ रोजी ठेवण्यात आले व संबंधितांना नोटीसा काढण्यात आल्या. सदर सुनावणीच्यावेळी अर्जदार स्वत: व त्यांचे प्रतिनिधी श्री. खापरे हजर झाले. श्री. खापरे यांनी या प्रकरणामध्ये आपले लेखी निवेदन दाखल केले आहे व त्यासोबत कांही पूर्वीच्या प्रकरणाचे दाखले हजर केलेले आहेत. त्याप्रमाणे अर्जदार व त्यांचे प्रतिनिधी श्री. खापरे यांचे युक्तिवाद या मंचाचे अध्यक्ष व सदस्य अनुक्रमे श्री. जगताप व श्री. लेले यांनी ऐकले. सदर दिवशी मंचाचे सदस्य सचिव श्री. बांबळे हे कार्यालयीन कामासाठी मुंबई येथे गेलेले होते व त्यामुळे ते हजर नव्हते. मात्र त्या दिवशी वि.प.तर्फे त्यांचे संबंधित अधिकारी आर्थिक वर्ष अखेर असल्याचे वीज बिलाची थकबाकी वसूल करण्याच्या कामात गुंतले असलेने त्यांना हजर राहता आलेले नाही व त्यांचेतर्फे पुढील तारखेसाठी विनंती करण्यात आली. त्याप्रमाणे वि.प.च्या युक्तिवादासाटी पुढील तारीख निश्‍चित करण्यात आली. पुढे दरम्यानच्या काळात अर्जदार श्री. हाके यांचंतर्फे २५.३.२००९ अशी तारीख असलेले पत्र व त्यासोबत कांही कागदपत्रे या कार्यालयास ता. ३०.३.२००९ रोजी प्राप्त झाली. पुढे वितरण कंपनीतर्फे ता. १५.४.२००९ रोजी त्यांनी यापूर्वी दिलेल्या उत्तराचे संदर्भात जादा तपशिलाचे उत्तर या कार्यालयास दिले व त्यासोबत कांही कागदपत्रें व फोटोग्राफ दाखल केले.

अशा प्रकारे वि.प.ने दिलेल्या म्हणण्याप्रमाणे व दाखल केलेल्या कागदपत्रांप्रमाणे अर्जदार श्री. नामदेव हाके यांना एजी २३६ अशी वीज जोडणी त्यांच्या विहीरीसाठी जरी दिलेली असली तरी संबंधितवेळी सदर ग्राहकाची वीज जोडणी व मोटर पंपसेट हा शेगाव तलावातील पाणी उपसा करण्यासाठी वापरण्यात आली होती. जत तालुक्यामध्ये पाणी टंचाई शासनाने जाहीर केलेनंतर तलावातील पाणी उपसा करणाऱ्या पंपाचे वीज कनेक्शन खंडीत करण्यात यावे असे पत्र शाखा अधिकारी, पाटबंधारे यांनी त्यांचे पत्र क्र. ५७७ दि. १५.७.२००८ रोजी वि.प.चे उप विभागास कळविले. त्या अनुषंगाने कार्यवाही करणेसाठी दि. २०.७.२००८ रोजी शाखा अधिकारी, कुंभारी श्री. डि.व्ही. कोळप हे त्यांचे सहकारी समवेत शेगाव तलावावर गेले असता श्री. नामदेव हाके व श्री. मल्हारी धोंडीबा हाके यांचे विहीरीची वीज जोडणी ही विहीरीवरील वीज जोडणी कनेक्शनच्या पेटीमधून अनाधिकाराने वापर जोडून शेगाव तलावावर मोटर बसवून तलावातील पाणी उपसा करीत होते. सदरची बाब बेकायदेशीर असल्याने त्यांचे कनेक्शन तोडण्यात आले. ता. २०.७.२००८ रोजी जो संबंधित रोहित्रावरील वीज पुरवठा खंडीत करण्यात आला हा शासनाचे ( पाटबंधारे अधिकारी तसेच शासकीय अधिकारी) आदेशान्वये पाणी टंचाईच्या धोरणानुसार आहे. असा विद्युत पुरवठा खंडीत करणे यांस विद्युत अधिनियम २००३ चे कलम ५६ मधील तरतुदी लागू होत नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. पुढे वि.प.चे असेही म्हणणे आहे की, ता. २०.७.२००८ रोजी खंडीत केलेला वीज पुरवठा ता. २८.८.२००८ रोजी पुन्हा जोडण्यात आलेला आहे. परंतु तद्‌नंतरही शेगाव तलावातील पाणी उपसा करणेसाठी श्री. नामदेव धोंडीबा हाके यांचे वीज जोडणीचा उपयोग त्यांचे कुटुंबियांनी ता. ३.२.२००९ रोजी तलावावर मोटर पंप बसवून व वीज जोडणी अनाधिकाराने करुन केलेला आहे. त्या बाबत जय सहकार पाणी वापर संस्था. शेगावचे चेअरमन व शाखा अधिकारी, पाटबंधारे

शाखा जत यांनी त्याबाबत पंचनामा केला आहे व मोटर व त्यावेळी तेथे हजर व्यक्तींचे फोटो घेतले व ते या प्रकरणात हजर केले आहेत.



सबब वि.प.चे म्हणणे की, अर्जदाराचे कृत्य बेकायदेशीर असलेने त्यांना कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई व मोबदला मागण्याचा अधिकारी नाही व तो फेटाळण्यात यावा. तदनंतर वि.प.तर्फे युक्तिवाद ऐक ण्यात आला व प्रकरण न्याय निर्णयासाठी ठेवण्यात आले.

सदरचे प्रकरण मंचाचे अध्यक्ष श्री. जगताप व सदस्य श्री. लेले या दोघांनी संबंधितवेळी ऐकले असलेने सदरचा निर्णय दोन सदस्यांमार्फत देण्यात येत आहे.

या प्रकरणात आमच्यापुढे आलेला तक्रार अर्ज व त्याबाबतचे वि.प.चे म्हणणे व दोन्ही पक्षकारांनी दाखल केलेली कागदपत्रे, अर्जदाराकडून लेखी निवेदन व निवाड्याचे दाखले तसेच कृती मानकेमधील तरतुदी, विद्युत अधिनियम या सर्व बाबींचा विचार करता, खालील मुद्दे आमच्या निष्कर्षासाठी उदभवतात.

मुद्दा क्र. १ : संबंधितवेळी कोसारी तलावातील पाणी पिण्यासाठी राखून ठेवण्या बाबत व त्या कारणासाठी पाणी उपसा बंद करणे बाबत व त्या अनुषंगाने विद्युत पंपांचा वीज पुरवठा बंद करणे बाबत संबंधित अधिकाऱ्यांनी आदेश दिला होता काय ?

उत्तर : होय

मुद्दा क्र. २ : अर्जदार श्री. नामदेव धो. हाके यांचे मोटरपंपाचा विद्युत पुरवठा हाही वरील आदेशाचे कारवाईनुसार बंद झाला काय ?

उत्तर : होय

मुद्दा क्र. ३ : श्री. हाके यांचा विद्युत पुरवठा वि.प.ने जो बंद केला ही कृती नियमबाह्य होते काय ?

उत्तर : नाही. कारण सदर वीज जोडणीचा उपयोग संबंधित वेळी बेकायदेशीरपणे करणेत येत होता.

मुद्दा क्र. ४ : ता. २०.७.२००८ रोजी संबंधित रोहित्राचा वीज पुरवठा बंद करण्यात आला ही बाब विद्युत अधिनियमच्या कलम ५६ च्या कक्षेमध्ये येते काय ?

उत्तर : नाही.

मुद्दा क्र. ५ : अर्जदार श्री. हाके यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांना नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क आहे काय ?

उत्तर : नाही

मुद्दा क्र. ६ : आदेश ?

उत्तर : अखेरच्या आदेशाप्रमाणे

<u>कारणमिमांसा</u> – मुद्दा क्र. १, २ व ३

सदरील प्रकरणामध्ये शेगाव तलावामधून मौंजे कोसारी हद्दीत पाणी उपसा करण्या संबंधात जत तालुक्यामध्ये पाणी टंचाई शासनाने जाहीर केल्यानंतर तलावातील पाणी उपसा करणाऱ्या पंपांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात यावा असे पत्र शासनाच्या पाटबंधारे विभाग यांनी पत्र क्र. ५७७ दि. १७.५.२००८ रोजी वि.प.चे उप विभागास दिले व कळविले. त्या अनुषंगाने कार्यवाही करणेसाठी दि. २०.७.२००८ रोजी शाखा अधिकारी, कुंभारी श्री. डि.व्ही. कोळप हे त्यांचे सहकारी समवेत शेगाव तलावावर गेले असता श्री. नामदेव हाके व श्री. मल्हारी धोंडीबा हाके यांचे विहीरीची वीज जोडणी ही विहीरीवरील वीज जोडणी कनेक्शनच्या पेटीमधून

अनाधिकाराने काढून त्या जोडणीवर शेगाव तलावावर मोटर बसवून तलावातील पाणी उपसा करीत होते. ही बाब वि.प.च्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आली होती.



तसेच शेगांव तलावातील ज्या नियमित वीज जोडणी होत्या त्या बाबत पाणी उपसा करण्यासाठी पाटबंधारे खात्याने शासकीय अधिकाऱ्यांचे सूचनेवरुन बंदी केलेली होती. अशी पाणी उपसा बंद ही विद्युत पुरवठा खंडीत केल्याशिवाय होवू शकणार नसल्याने शेगाव तलावानजिक व त्या तलावावर असलेल्या विद्युत मोटारी बाबत विद्युत रोहित्र हे पूर्णत: बंद केल्याशिवाय अशा मोटारी बंद होवू शकत नव्हत्या. सबब तलावावरील पाणी उपसा बंद करण्यासाठी ज्या कांही तेथे मोटारी चालू होत्या व ज्यामध्ये श्री. नामदेव धों. हाके यांचीही मोटर विहीरीवरुन काढून तलावावर बसविण्यात आली होती, त्या बाबतही विद्युत पुरवठा खंडीत करणे व होणे अपेक्षित होते. तलावावरील मोटारींचा विद्युत पुरवठा बंद करणे ही बाब शासकीय आदेशानुसार झाली असल्याने त्या बाबत अर्जदारास कोणतीही हरकत घेता येत नाही व तशी त्याने घेतलेली नाही. तलावानजिकच्या विद्युत रोहित्रावरुन तलावावरील मोटारी तसेच तलावा नजिकच्या विहीरीवरील मोटारीसाठी विद्युत पुरवठा केला होता व आहे. सबब तलावावरील मोटारी बाबत खंडीत केलेला विद्युत पुरवठा हा शासकीय आदेशानेच झाला आहे या बाबत आमच्या समोर जरुर ती कागदपत्रें व आदेशपत्र वि.प.तर्फे दाखल करण्यात आलेली आहेत. असे पत्र म्हणजे तहसिलदार, जत तसेच उप अभियंता, लघु पाटबंधारे, जत तसेच शासनाचे उप सचिव यांच्याकडील पत्र दि. १८.७.२००८ व त्यापूर्वीची अधिसूचना दि. १.११.२००४ जी उप विभागीय अधिकारी, मिरज यांनी काढलेली होती. या सर्व कागदपत्रांवरुन तलावावरील मोटारी संबंधात खंडीत केलेला विद्युत पुरवठा हा शासकीय आदेशानुसार झालेला आहे असेच मानावे लागते. तसेच तलावावरील मोटारी बाबत खंडीत झालेल्या विद्युत पुरवठ्या बाबत त्या कोणत्याही ग्राहकाने आमच्या समोर तक्रार केलेली नाही. सबब मुद्दा क्र. १ बाबत आम्ही होकारार्थी उत्तर दिले आहे.

याच विद्युत रोहित्रावर तक्रारदार श्री. नामदेव धों. हाके यांच्या विहीरीवरील मोटार पंपासही वीज जोडणी दिलेली होती. परिणामी, विद्युत रोहित्रावरील विद्युत पुरवठा बंद केल्याने अर्जदाराच्या विहीरीवरील मोटारीचा विद्युत पुरवठा खंडीत झालेला आहे, ही बाब वि.प.से मान्य आहे. परंतु वि.प.चे असे म्हणणे की, संबंधितवेळी म्हणजे दि. २०.७.२००८ रोजी तक्रारदार यांची विहीरीवर असणारी मोटर ही विहीरीवर नव्हती व ती मोटार तलावातील पाणी उपसत होती. अर्जदाराने विहीरीवरील वीज जोडणी व पंपसेट बेकायदेशीररित्या तलावाचे पाणी उपसण्यासाठी वापरला, हीही बाब आमच्यासमोर आलेल्या कागदपत्रांवरुन सिध्द झालेली आहे.

या बाबत वि.प.तर्फे दाखल केलेले म्हणण्याबाबत अर्जदारातर्फे उत्तर अथवा हरकत दाखल नाही. तसेच संबंधितवेळी म्हणजे दि. २०.७.२००८ रोजी री. नामदेव हाके हे घटनास्थळी होते व त्यांची मोटार विहीरीवर चालू होती असाही उल्लेख अर्जदारातर्फे आलेला नाही. सबब वि.प.चे अधिकाऱ्यांचे म्हणणे ग्राह्य धरणे क्रमप्राप्त आहे. अर्थात वि.प.तर्फे या प्रकरणामध्ये दि. १.२.२००९ चा एफ.आय.आर., ३.२.२००९ चा पंचनामा व अन्य फोटो दाखल केले आहेत. परंतु हे सर्व दि. २०.७.२००८ नंतरचे असल्याने आम्हास त्याचा पुरावा म्हणून या प्रकरणी आधार घेता येत नाही.

परिणामी, जरी अर्जदाराचा विद्युत पुरवठा दि. २०.७.२००८ रोजी खंडीत झाला असला व तो पुढे दि. २८.८.२००८ पर्यंत तो तसाच खंडीत राहिला गेला, या बाबत आमचा असा निष्कर्ष आहे की, शासनाचे आदेशानुसार तलावावरील मोटारी बाबतचा विद्युत पुरवठा खंडीत करण्याच्या आदेशामध्ये अर्जदाराच्याही

मोटारीचा विद्युत पुरवठा ज्या मोटारीने अनाधिकाराने तलावाती पाणी उपसा केला जात होते, तोही खंडीत होणे अपेक्षित व आवश्यक होते.



यामध्ये जर अर्जदाराने त्याची वीज जोडणी बेकायदेशीर कामासाठी वापरली (तलावातील पाणी उपसा करण्यासाठी) तर त्यामध्ये अर्जदारास कोणत्याही प्रकारची तक्रार करण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. तसेच त्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मागण्याचाही अधिकारी प्राप्त होत नाही. अशी वीज तोडणी ही आमच्या मते नियमबाह्य होत नाही, कारण तलावावरील मोटारींचा विद्युत पुरवठा बंद करणे या बाबत शासन/ पाटबंधारे विभाग/ महसूल विभाग यांचे आदेश होते. सबब असा अर्जदाराचे मोटारीचा खंडीत केलेला वीज पुरवठा हा नियमबाह्य होत नाही यामुळे मुद्दा क्र. २ कडे आम्ही आमचे होकारार्थी उत्तर दिले असले तरी आम्ही मुद्दा क्र. ३ बाबत नकारार्थी उत्तर दिलेले आहे.

<u>मुद्दा क्र. ४ व ५</u>

या प्रकरणामध्ये अर्जदारातर्फे प्रतिनिधी श्री. खापरे यंनी आमच्यासमोर तोंडी निवेदन तसेच लेखी निवेदन हजर केले आहे. तसेच तक्रार अर्जामध्ये असा अर्जदाराचा खंडीत वीज पुरवठा हा विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ५६ अन्वये ग्राहकास किमान १५ दिवसांची आगाऊ नोटीस दिली नसल्याने बेकायदेशीर आहे असे म्हणणे मांडलेले आहे. तसेच पुढे त्यांचें म्हणणे की, असा कलम ५६ प्रमाणे बेकायदेशीरपणे खंडीत केलेला विद्युत पुरवठा हा कृती मानकाचा भंग होत असून ग्राहकास प्रति तास रु.५०/– प्रमाणे भरपाई मागण्याचा हक्क आहे व अशी भरपाई त्यांना देण्यात यावी. तसेच त्यांना झालेला मानसिक त्रासापोटी दंड देण्यात यावा. तसेच त्यांची १ महिन्याच्या कालावधीत झालेल्या पिकाच्या नुकसान भरपाई बाबत रु. ५०००/– देण्यात यावी, असे म्हटले आहे. श्री. खापरे यांच्या वरील निवेदना संबंधात आम्ही विद्युत अधिनियम २००३ चे कलम ५६ बाबत बारकाईने विचार केला. त्यामध्ये विद्युत पुरवठा खंडीत करण्यासाठी ग्राहकास १५ दिवसांची नोटीस देणे आवश्यक आहे. परंतु ही १५ दिवसांची नोटीस देण्याची तरतूद ही, जर एखाद्या ग्राहकाने त्याच्याकडे असलेल्या वीज बिलाचा मुदतीमध्ये भरणा केला नाही तर वि.प.स विद्युत पुरवठा खंडीत करण्याचा अधिकार प्राप्त होतो, व त्या संबंधात १५ दिवसांची नोटीस देणे आवश्यक आहे. सारांश, आमच्या मते कलम५६ मधील १५ दिवसांच्या नोटीसीची तरतूद बिलाच्या थकबाकीबाबत खंडीत करावयाच्या विद्युत पुरवठ्या बाबत लागू आहे. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की, थकबाकी व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणाने जर विद्युत पुरवठा खंडीत केला असेल अथवा करावा लागणार असेल तर अशा प्रकरणा बाबत कलम ५६ ची तरतूद लागू होवू शकत नाही. परिणामी, अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे प्रति तास रु. ५०/– नुकसान भरपाई मागण्याचा अर्जदारास हक्क प्राप्त होत नाही तसेच अशी नुकसान भरपाई देताही येवू शकत नाही.

तसेच आमच्यापुढे आलेल्या कागदपत्रांप्रमाणे, संबंधित विद्युत रोहित्रावरुन होत असलेला विद्युत पुरवठा हा तलावावर चालू असलेल्या विद्युत मोटारीबाबत खंडीत करण्याचे शासनाचे आदेशाप्रमाणे आवश्यक होते. अर्जदाराची विद्युत मोटर संबंधित वेळी तलावातील पाणी उपसा करीत होती व त्यामुळे अर्जदाराचा असा विद्युत पुरवठा खंडीत झाला या बाबीवरुन कोणतीही नुकसान भरपाई मागता येत नाही. कलम ५६ प्रमाणे बंद झालेला विद्युत पुरवठा जर १५ दिवसांचे नोटीसीशिवाय असेल तर तो बेकायदेशीर होतो व तो देखील थकबाकी न भरल्यामुळे १५ दिवसांची नोटीसीने करता येवू शकतो. आमच्या समोर आलेल्या प्रकरणामध्ये शासनाचे संबंधित अधिकाऱ्याच्या आदेशाप्रमाणे व पाणी टंचाई निर्माण होवू नये या संबंधात घेतलेल्या निर्णयाच्या

अनुषंगाने, सार्वजनिक हितासाठी संबंधित विद्युत पुरवठा हा बंद करण्यात आला असल्याने, कलम ५६ ची तरतूद या प्रकरणामध्ये लागू होत नाही.



तसेच खंडीत झालेला विद्युत पुरवठा हा कायदेशीरच होता असे दिसून येते. परिणामी, कोणतीही नुकसान भरपाई मागण्याचा अर्जदारास हक्क प्राप्त होत नाही. सबब मुद्दा क्र. ४ व ५ कडे आम्ही नकारार्थी उत्तरे नोंदवित आहोत.

अर्जदारातर्फे प्रतिनिधी श्री. खापरे यांनी मा. विद्युत लोकपाल, मुंबई यांच्या निकालाचे कांही दाखले आमच्यासमोर दाखल केलेले आहेत. परंतु त्या सर्व निकालामध्ये विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ५६ चा अंतर्भाव आहे. परंतु आमच्या समोरील प्रस्तुत प्रकरणामध्ये कलम ५६ लागू होत नसल्याने अशा मा.विद्युत लोकपाल यांनी दिलेल्या निकालांच्या दाखल्याचा या निकालपत्रामध्ये आपणांस उपयोग करता येत नाही व त्याचा आधारही घेता येत नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करता. अर्जदाराचा अर्ज फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. मात्र या प्रकरणाचा विचार करता, या अर्जाचे खर्चा संबंधात, खर्च ज्याचा त्याने सहन करणे योग्य वाटते. परिणामी, खर्चाबाबत कोणताही आदेश नाही. सबब खालील प्रमाणे आदेश –.

## <u>आदेश</u>

१) तक्रार अर्ज क्र. ०८/०९ फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ०१.०७.२००९

(काकासाहेब य. जगताप)
अध्यक्ष

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :